## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१२/०७/२०१९

## दि.११/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ६३८/१९,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४३ वर्षे,रा.शिक्षक निवास,सावीत्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे |
| **आरोपी** | योजनेतील एकुण तीन समन्वयक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे नोव्हेंबर २०१७ ते फ्रेब्रवारी २०१९ रोजीचे कालावधीत सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे येथे संचालक विद्यार्थी विकास मंडळ (अतिरिक्त कार्यभार),पुणे या पदावर कार्यरत असुन,यातील नमुद कमवा व शिका योजनेतील एकुण तीन समन्वयक यांनी संगनमत करून,सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे येथील “कर्मवीर भाऊराव पाटील,कमवा आणि शिका” या योजने मधुन विदयार्थ्यांची खोटी नावे देवुन,त्यांच्या नावे असलेले पैसे सदर समन्वयक यांनी स्वतःचे बॅक खात्यावर घेवुन,तसेच काही विदयार्थी हे कमवा व शिका योजनेत काम करीत नसताना,त्यांना कमवा व शिका या योजनेचे विदयार्थी दाखवुन,त्यांचे बॅक खात्यावर पैसे टाकुन,ते परत स्वतः रोख स्वरुपात घेवुन एकुण सावित्रीबाई फुले विद्यापीठाची एकुण ३,४६,८६०/- रुपये इतक्या रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.डी.दराडे ९४२०६६७७८९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे २४३/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२७ वर्षे,रा.धानोरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात माबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०३/२०१९ रोजी ते आजपावेतो फिर्यादी यांचे रहाते घरातुन ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात माबाईलधारक इसमाने फिर्यादी यांना फोन करून,त्यांचे बॅंकेचे डेबिट कार्डचे नुतनीकरण करावयाचे आहे असे सांगून,त्यांचा विश्वास संपादन करून,फियर्सादी यांचे बॅंक खात्याचे गोपनीय डिटेल्स घेऊन,त्यांचे खात्यामध्ये असलेली रक्कम ८१,२४१/- परस्पर काढून घेऊन फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली आहे. (सदरचा गुन्हा हा सायबर पोलीस ठाणे येथे ००/१९ ने दाखल आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.आर.जे.घुगे ९५५२५९०३४७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २८२/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४१ वर्षे,रा.खराडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक, बॅंकेचे खातेधारक व मेलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/३/२०१९ रोजी १४/०० वा. ते दि.२०/३/२०१९ रोजी १६/०० वा. चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादी यांना पुजा या नावाने फोन करून,त्यांना लग्नाचे अमिश दाखवुन,वेग-वेगवळया कारणासाठी त्यांचे बॅंक खात्यावर एकुण २,८४,७००/- रू ऑनलाईन आयएनएफटीव्दारे भरावयास लावून,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) सत्यवान पाटील ९५४५९०३१०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे २१४/१९,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | व्यंकटेश चिरमुल्ला,वय-५० वर्षे,रा.७१२,गुरुवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०७/२०१९ रोजी १८/३० वा.ते दि.१०/०७/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा.चे दरम्यान हवेली प्रांत ऑफिसचे आवारात क्वीन्स गार्डन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मंडल अधिकारी हडपसर,पुणे येथे असुन, त्यांनी मा.तहसीलदार,तहसील कार्यालय,हवेली,पुणे यांचे आदेशान्वये तलाठी व कोतवाल असे हडपसर ते शेवाळीवाडी रोड वर रुकारी पेट्रोल पंपा जवळ अनाधिकृतपणे गौण खनिज वाहतुक करणा-या वाहनांवर कारवाई करण्याकरिता थांबले असताना, ११/३० वा. चे दरम्यान त्यांना शेवाळवाडी जकातनाका येथे ट्रक नं.१)एमएच/१४/डीएम/८८८० २)एमएच/१२/डीटी/८७०० ३)एमएच/४५/७७०७ ४)एमएच/१२/एक्यु/४४६४ या वाळुच्या गाड्या अनधिकृतपणे वाळुने भरलेल्या स्थितीत मिळून आल्याने,त्याबाबत सदर गाडीची पाहणी करता,गाडीमध्ये असलेले चालक हे फिर्यादी यांना पाहून ट्रक हे जागेवर सोडुन पळुन गेलेने,फिर्यादी यांनी त्यांचे ओळखीच्या चालकांकरवी सदरचे ट्रक हे अल्पबचत भवन जवळील हवेली प्रांत ऑफिसचे आवारात आणुन लावले असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने वाळुचे एकुण चार ट्रक १२,५०,००० रू किचे चोरी करून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. लोंढे ८९७५०२०५०० |

**"सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणेचे सुसंवाद कार्यक्रमा बाबत" दि.१२/०७/२०१९**

सर्व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांना कळविण्यात येते की, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर हे संत ज्ञानेश्वर सभागृह,मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले,पुणे विद्यापीठ,पुणे येथे आज दि.१२/०७/२०१९ रोजी दु.१६/०० वा. 'पुणे शहर पोलीस दलाची कार्यपध्दती तसेच कायदा व सुव्यवस्था' या विषयावर सुसंवाद साधणार आहेत.

सदर कार्यक्रमासाठी कुलगुरू, अधिसभा, सदस्य व कुलसचिव तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी सदर कार्यक्रमासाठी आपण फोटोग्राफरसह उपस्थित राहावे हि विनंती.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुकत कार्यालय,पुणे